**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT - 3 (2023-24)**

**GRADE: V** **MARKS: 50**
**SUB: MARATHI** **TIME: 2 Hrs**

---

**प्रश्न १. खालील पठित उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **(५ गुण)**
**(Read the passage carefully and follow the instructions given below.)**

आमची सहल गावच्या आमराईमध्ये गेली होती. सहलीला वर्गातील सर्व मुलेमुली आल्या होत्या. बाईंनी सगळ्यांना जेवणाचे डबे व पाण्याच्या बाटल्या आणायला सांगितले होते. चित्रकलेचे साहित्यही बरोबर घ्यायला सांगितले होते.

आम्ही आमराईकडे निघालो. रस्त्यावर वेगवेगळ्या आकारांची, वेगवेगळ्या प्रकारची झाडे होती. झाडांची दाट सावली रस्त्यावर पडली होती. आम्ही रमतगमत, झाडांचे निरीक्षण करत चाललो होतो. रस्त्याने जाताना बाईंनी विविध झाडांची माहिती सांगितली.

आमराईमध्ये आम्ही सकाळी अकरा वाजता पोहचलो. तेथे आंब्याची खूप झाडे होती. ती ओळीने लावलेली होती. मी बाईंना विचारले, "बाई, याला आमराई का म्हणायचे?" बाई म्हणाल्या, "राई म्हणजे दाट झाडी, जिथे आंब्याची अनेक झाडे लावून ती जोपासलेली असतात, त्याला आमराई म्हणतात."

**कृती १ : आकृती पूर्ण करा.(Complete the diagram.)**

| या गोष्टी बाईंनी मुलांना आणायला सांगितल्या | → | |
|---|---|---|
| | → | |

**कृती २ : चौकटी पूर्ण करा.(Fill in the boxes.)**

१. सहल गेली ते ठिकाण -
२. झाडांची रस्त्यावर पडलेली -
३. आमराईमध्ये पोहोचण्याची वेळ -

**प्रश्न २. रिकाम्या जागा भरा.(Fill in the blanks.)** **(५ गुण)**

१. फुलवेली मज ------------ देती, कुठे लव्हाळी खेळत बसती.
२. जरा बाजारात फिरत जा, ------------ जात जा.
३. मायाने आनंदाने ------------ वाजवल्या.
४. पर्वत उतारावरून नदी सपाट ------------ भागात येते.
५. जेथे जाईन तेथे ------------, बाग मनोहर आनंदाची!

**प्रश्न ३. खालील इंग्रजी शब्दांचा मराठीत अनुवाद करा.** **(४ गुण)**
**(Translate the following English words into Marathi.)**

१. A valley-
२. Heat -
३. To tired -
४. Polluted -

**प्रश्न ४. खालील वाक्य चूक की बरोबर ते लिहा.** **(४ गुण)**

**(Write whether the following sentences are true or false.)**

१. रेश्माने दार उघडले.

२. आईच्या हातात दोन मोठ्या पिशव्या होत्या.

३. नदीचे पाणी खारट असते.

४. सगळ्या कैऱ्यांचा चट्टामट्टा केला.

**प्रश्न ५. खालील शब्दांपासून वाक्य बनवा.** **(३ गुण)**

**(Make sentence from the following words.)**

१. प्रवास-

२. मंजूळ -

३. सुट्टी -

**प्रश्न ६. खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.** **(३ गुण)**

**(Answer the following questions in one or two words.)**

१. पत्र कोणी पाठवले?

२. माणसे नदीला अडवायला काय बांधतात?

३. आईचे हात कसे झाले होते?

**प्रश्न ७. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(५ गुण)**

**(Answer the following questions in one sentence.)**

१. आईकडे बघून मुलाला काय जाणवले?

२. मायाने कोणाचे आभार मानले?

३. गावे कोठे वसली आहेत?

४. नदी आपल्याला कोणता संदेश देते?

५. काकांनी पत्र लिहिताना कशाचा वापर केला होता?

**प्रश्न ८. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(४ गुण)**

**(Answer the following questions in brief.) (Any two)**

१. आईला बरे का वाटले?

२. पत्रावरील अक्षरे दिसण्यासाठी रेश्माने काय केले?

३. 'नदीचे गाणे' या कवितेत नदीचे वर्णन कसे केले आहे?

## व्याकरण (Grammar)

**प्रश्न १. अ) खालील अंक शब्दांत लिहा. (Write the following numbers in words.)** **(२ गुण)**

१. ६९ - २. ५६ -

**आ) खालील समानार्थी शब्द लिहा. (Write the synonyms of the following words.)** **(२ गुण)**

१. सागर = २. वेग =

**इ) खालील विरुद्धार्थी शब्द लिहा. (Write the antonyms of the following words.)** **(२ गुण)**

१. हसणे x २. सुरुवात x

**प्रश्न २. अ) खालील वाक्यांतील विशेषण ओळखा व लिहा.** **(२ गुण)**

**(Identify and write the adjective from the given sentences.)**

१. मधात औषधी गुण असतात.

२. अंगणात सुरेख रांगोळी काढली होती.

**आ) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे लिहून वाक्ये पुन्हा लिहा.** **(२ गुण)**

**(Rewrite the following sentences by using correct punctuation marks.)**

१. अबब केवढा मोठा अजगर हा

२. रमेश सीता अनिता गणेश हे सर्वजण दररोज बागेत खेळतात

**इ) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व लिहा.** **(२ गुण)**

**(Read the following paragraph carefully and rewrite it.)**

संध्याकाळच्या वेळेला दामूकाका घरी आले, ते हाका मारतच. “वहिनी, अहो वहिनी.” आईबाबा बाहेर आले. “काय रे बाबा ? कपडे आणलेस का?” जरा वैतागूनच आईने विचारले. दामूकाकांनी खिशातून पैसे काढले. पैसे मोजून घ्या आणि हे कपडेही घ्या. आईने पैसे मोजले.

**प्रश्न ३. खालील पैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** **(५ गुण)**

**(Write a letter on any one of the following topics.)**

१. तुमच्या मित्र /मैत्रिणीला पोहण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्याचे /तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

२. नवीन घड्याळ घेऊन देण्याची विनंती करणारे पत्र वडिलांना लिहा.

**********************************************